नाताळ २५ डिसेंबर २०२१

# कादोडी

दाहवा वहरी  एकून १७ वॉ अंक

( खाजगी वितरण)



# कादोडी

## नाताळश्या हनाव विशेषांक

२५ डिसेंबर २०२१

दाहवा वहरी
एकून सतरावॉ अंक

खाजगी वितरन

### या अंकात .......

संपादकीय
निरनय - जोसेफ तुस्कानो
नशा - सॅबी परेरा
खांबा खालसा भूत - सिरील मिनेझीस
किश्शॅ फादर्स-सिस्टर्सशॅ - फा. अंब्रोज फर्नांडीस
नक्की कून रॅ तू ? - ब्रिनल कुडेल
योग्यता – पॅट्रिक कोरिया
बय पान - रॉबर्ट फर्नांडिस
सामवेदी खाद्ययात्रा - केतकी अभिजीत वझे
बॉड्डाइ बाव - सायमन मार्टिन
दॅवा माला तुला कय हांग्यासा हाय - मॅक्लीना रिबेलो
वाटणी  - शकुंतला नारायण पाटील

**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान नातॅ आपला या अंकाविषयीसा मत, संपादक मंडळाश्या कुनालाही भॅटॉन जरूर कळवा.

**प्रमुख संपादक**
ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८)

**कार्यकारी संपादक**
एडवर्ड डिसोजा

**संपादक मंडळ**
सुनील बा. डिमेलो, सायमन रॉड्रिग्ज, तेरेजा डिसोजा, जेम्सन डिमेलो, डॅनियल मस्करणीस, रॉबर्ट फर्नांडिस, राजन डिमेलो, रॉबिन्सन डिमेलो, वॉल्टर तुस्कानो, सिरील मिनेझीस

**मुखपृष्ठ :-** पॉल डिमेलो, गास

**Email :-** kadodivasai@gmail.com

**Web :- www.kadodi.in**

या अंकात प्रसिद्ध जालॅल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदॅस आहा नाय.

**सूचना:-** ‘कादोडी’ या अंकात तुमाला लेख, कविता आहा कय द्यासा हायदॅ तॅ **kadodivasai@gmail.com** याओरती धाडा नातॅ संपादक मंडळाला भेटा.

जकलॅ जाहिरातदार, देनगीदार तहॅस बरा-वाईट मत देनाऱ्या जकल्या कुपारी लॉकांअॅ आमॅ खूप आभार मानत्याव.
**नाताळसॉ हन सब्बान कुपाऱ्यांना खुब आनंदाव आन मजॅऑ जाओ अह्यो शुभेच्छा.**

# संपादकीय

जकलॅंना नाताळश्या हनायो खुब खुब सुबेछा.

मंडळी, आतॅ कडॅ जकला व्यवस्थित सुरू हॉवॉन जाग्योर लागलॅ बास तव करोनासा ओमिक्रॉन नावासा नवा रूप आलॅ आन तॅनॅ माकून खयताळॉ घालॅ आहा हांगॅ लागलॅत. पुडॅ पन, भविशॅत करोनापेक्षा बॅक्कार विषानूश्यो लाटी येत रॅनार आहा पन हांगीला जातॅ. आतॅ पयलॅहारकॅ दी कतॅ येद्यात यायी वाट बगीत बॅहनॅत कय अर्थ नाय. पयलॅ लाटॅपेक्षा दुहरॅआ लाटॅत मंजॅ यंदा एप्रिल-मे मयनॅत आपल्या वसयमीनॅ आन आपल्या कुपारी समाजात आपले जिवाभावाशे माहने आपलॅतनॅ निगॉन गेले. जवळजवळ आपले बवतेक घरे दू:खात होते या काळात. परिशिती जाम भयानक होती. पन तॅस वॅळॅला खुपश्यो चांगल्यो गोष्टीपन घडल्यो, जरी या महामारीनॅ आपलॅला ॲकामेकापासून लांब ढकलला तरी मनानॅ आपुन जवळ आले, खुब लोकाई पुडॅ यॅवॉन अडल्या नडलेल्यांना मदतीऑ हात दॅवॉन मानूसकी टिकॉन हाय यी दाखडॉन दिला. समाज भगून आपुन एक हाव यी पन दिखला. गावागावश्यो आपल्यो संघटना एकत्र यॅवॉन का करू शकातॅत ता उमजाला.

कामधंद्याबाबतीतपन लोक बरास जागरूक जाला. घरसॉ भाजीपालॉ पिकवॅ करता लोक भाटात जा लागला. यातनॅ शार पैसे कहॅ मिळदॅत याव विसार हॉव्या लागलॉ. जे कतॅ भाटात गेले नोते ते खप्या लागले तहेस जॅ धंदॅत कातॅ लक्ष पन दिला नॉता तॅत नुसते घुसलेस नाय तर बरॅपैकी कमवॅ लागले. घरपोच डिलिव्हरी करता लोक लाजॅसा रॅला. मला वाटातॅ, ऑ जालॅलॉ बदल पुडॅ खुब कय चांगला हाडू शकातॅ. या करोना काळात एक गोष्ट विशेष जानवाली ती मंजॅ आपल्या परिसरात एक चांगला भॉटा हॉस्पिटल अहॅ पाय यी गरज. त्यामुळॅ लॉकायॅ खुब हाल जालॅ दुहरॅ लाटॅत, आपल्या अडशे कायिक लोक तॅबाबतीत कामाला पन लागलॅत, तॅना तॅत यश येवो.

बी एक चांगला काम या करोना काळात जाला, आपलॅ सॉहळॅ हजार महानोरनॅ दिडशे-दोनशे लॉकात हॉया लागलॅ, नुसते कॉमसारायॅ प्रोग्राम नाय तर लग्नायॅ प्रोग्राम पन. आन लॉकांना यी पन कळाला की नुसती पैशायीस बचत नाय हॉयॅ तर जिवान फुकाट नाय जाय आन बारकॉ बारकॉ प्रोग्राम मस्त होवू शकातॅ. आपल्या या प्रोग्रामसा एक होता की हुक्काळीये आवतने कऱ्याशे आन मंग तॉडा लोक नाय आला गा जिवान कॅलॅ तॅई नासाडी. पन सदॅतरी बारक्या कार्यक्रमामुळॅ ती कमी हॉया लागले आन पुडॅ पन हॉत रॅदॅ अही आशा हाय.

मंडळी, गेले ९ वहरे जाले आपुन यॉ कादोडी अंक प्रकाशित करतॅव, खूपसा साहित्य (लेख/कथा/कविता) यातनॅ आपुन आपल्या भाशॅआ संवर्धनाकरता जमा कॅलॅ आतॅपोत आन पुडॅ पन होत रॅदॅ, आपल्या जकलॅंना नम्र आवाहन हाय की आतॅ आपुन यॉ अंक वहाराला एकदा तॉ पन नाताळशॅ हना वॅळॅला काडतॅव, त्यामुळॅ जुन्या लॉकांना आवाहन हाय की तुमशॅ अनुभव आमश्यापोत पोसवा. आपली भाशा टिकवॉन ठवॅसॉ यॉ आपलॉ बारकॉसॉस प्रयत्न हाय, त्याला आपल्या जकलॅयी साथ पाय.

कादोडी अंकातनॅ आपली भाशा जगवॅकरता प्रयत्न करतॅवुस पन दरवाहरा आपल्या समाजॅआ भलॅकरता एक बरॉ विसार पन देतॅव. एक कुपारी समाज आपुन जकले सोबत रॅवॉन पुडॅ जाऑ.

# निरनय

- जोसेफ तुस्कानो, बोरीवली

खिडकीतनॅ दिखनारॉ सूर्याऑ लालभडाक गॉळॉ क्षितिजापल्याड दिख्यासॉ रॅलतॉ. वरशा आबाळातनॅ चंद्राई कोर वर वर या लागलोती. एकेक करॉन तारॅ दिख्या लागलोतॅ. जकल्या बाजूनॅ काळोक हॉया लागलोतॉ. तॉस दारोरशी बेल वाजली. दादयनॅ दार उगडला. महेश कामोर जाऑन आलतॉ.

“मम्मे, रुबी कडॅ हाय?” तॅनॅ विसारला.

“प्रिया तिला निजव्या लागले. तुमश्या बेडरूममिनॅ हाय”

“आन, पप्पा कडॅ दिखॅ नाय तॉ?”

“तुआ पप्पानॅ आजपासून नई नोकरी धरलॅ, मॅ तॅईस वाट बगीतॅ”

“नई नोकरी?, पन कादो?, पप्पा रिटायर जालॉ तिगाळा हांगातॉतॉ ना, माआ पेन्शन आन एफडी वरसा व्याज खूब हॉयॅदॅ.”

पप्पानॅ मम्मीला जरासा कय हांगॉन ठोविलता, ती पान मनातनॅ दुखी जालती. ती महेशला कय बोयली नाय. तॉस माकून दारोरशी बेल वाजली. पायतू कामोरनॅ घारा आलते. बी कतॅ, ते बायेरनॅ आले गा, “माई सोनुली कडॅ हाय दॅ बरा?” अही हाक देत घरात घुश्याशॅ, पाळन्यात निजॉन अहलेली बायसुदा जॉरात आपलॅ बारकॅ बारकॅ हात हालव्याशी आन खुशी दावड्याशी. नजार अडनॅतडनॅ फिरव्याशी. आपल्या आजुनॅ वॅगॅत घॅआ करता उतळी करॅशी. आन तिआ आजुआ बॉबड्या हाखेकरता, पपा तिला कितीतरी लाडाआ नावानॅ हाको मारॅसॉ.

‘माई सोनुली’, ‘माई छकुली’, ‘माई लानी परी’, ‘माई लानुली’, ‘माआ लबाड लाडका डोंगर’, ‘माय बार्बी गर्ल’, ‘माय ट्विंकल स्टार’, ‘माय लिटल प्रिन्सेस’....

रुबी बाळाला जाहा कय ता समजॅसा. ती जाम खुश हॉॲशी. आजुआ वॅगॅत खयताळॉ घालॅशी. हांज जाल्योर बय तिला पाळनॅत घालॉन बोलीभाशेत गानॅ बॉलॉन नीजवॅशी.

‘यॅला तू गाये, दॅला तू दुद
बायला माज्या भूक लागयेली..!!

लागल्या भूकॅसॉ जालॉ काला वेळ
नाय पुरॅ खेळ बायसॉ माज्या..!!
बायशी माजी आडी घालनॅ पाळनॅआ
आथा देनॅ खॅळना झेंडूफळ..!!

झेंडूफुलाश्यो गाथीनॅ  माळी
धाडनॅ दारी मावलीशा..!!
मावलिशा दारी वाजॅ तुरॅभेरी
जायदॅ लेकुर वाळी नवस घिती..!!

बायशी माजी आडी कबाडात काजाळ
गोकुळात मामार बायसा माज्या..!!
बायशे माजॅ मामू कयशानॅ नाय दुबळॅ
दारीशॅ हिंदाळॅ सोनियाशॅ..!!
सोनियाशॅ हिंदाळॅ रूप्याशॅ झुपानॅ
त्यावरी बसलॅ बायसॉ मामू..!!

दादयसॉ गानॉ खपे तव बाय हलकेस निज्याशी. आज दादयनॅ बायला नीजवॅ करता प्रिया दरी दिलता. पपा पन कय बोयलॉस नाय. जकले गप-गप ओथे. पपानॅ महेशवर बगीला आन, ‘लवकर आलॉ वाटातॅ’ आहा मुकाटॅय विसारला आन तॅआ खोलीत खीरलॉ.

‘तुमे सोनुलीला मा पासून तॉडणार हायदॅआ, तॅ तिला माव आन माला तीऑ लळॉ नाय लागलॅलॉ बरॉ. आमा दोगांना तरास हॉयदॅ.’ महेशला पपाय शब्द आठवालॅ. तॉ कडू परसंग आठवालॉ आन तॅआ तॉंड नाहाला. प्रिया पुडॅ तॅआ कय सलात नॉता. ताहा बगीला तॅ पपाला नातीइ कोडी ओड. ती जन्मा याशा आदीस तॅनॅ कोडी होस केल्ती. आपल्या नाता करता का करॉ आन का नाय आहा तॅला जालता. तॅनॅ गानॅ जमा कॅलतॅ, कान्यो जमा केल्त्यो. खेळने कोडे हाडलोते.. काश्मीरला गेलते तॅ तड्नॅ नक्षी केलेल्यो बारके बारके चप्पल हाडले.

‘मॅ आतॅस हांगॉन ठवीतॅ, मॅ यापुडॅ कय कामधंदॉ करनार नाय.’ ॲका बोठ्या प्रायवेत कंपनीतनॅ रिटायर जालॉ त्यास दिहा पपानॅ जकल्याना हांगॉन टाकीलता. ‘आतॅ सोनुली इज माय फूल टाइम जॉब’ त्यादिहा पपाला आनंदायो उकळ्यो फुटात्योत्यो.

मागशा आठोड्यातशी गोश्ट. महेश पपाहरी कयतरी आडॉन आडॉन बॉलातॉतॉ.

‘तुला जा का हांगॅसा हाय ता सरळूस बॉल, आडॉन नाका बॉलॉ. आपल्या घारात सरळ स्पस्ट बॉलॅशी पद्द्त हाय.’

‘ता का हाय ना पपा, प्रिया हांगातॅ आपुन आतॅ वायले रॅऑ.’

आहा गा ? पन कदो ? कॅआ करतान ?

ती हांगातॅ, ‘आपू रुबीला नव्या आधुनिक परकारॅ वाढवॉ. तूआ ठीक हाय पन ममी! ती हिकलेली नाय ना. कतॅ कतॅ ती वॅंदव्याहारकी वागातॅ. त्योरनॅ बेबीओर गावठी संस्कार हॉयद्यात. ममी रुबीला निजविताना तॅ का गानॅ बॉलातॅ?

‘रमेदाये आये, ऐक माजा गराना.... नातॅ ‘मुगले मुगले नास लो...’ ऑल बुलशीट.

“पॉरा, पन तू तॅआस गान्योर वाडलॉ गा” आहा बॉलॅसा पपाआ मनात आलता. पन तो गप बॅहॅलॉ. पॉर निमिते हांगातॅ इ पपाला कळातॉता. खरा मिंजॅ महेशनॅ दादयबद्दल जा बोयला ता आयकॉन पपाला जाम शीड आल्ती. पन तॉ कय बोयलॉ नाय. मागॅ पपा ॲका मित्रा पॉरानॅ तॅआ बयबाबाला वायला काडला तिगाळा पपानॅ तॅला “बैल” आहा नाव दिलता. आन आज तॅनॅ ज्या पोरोर संस्कार कॅलॅ, जॅला हिकविला, तॉ पन मित्राआ पॉराआ पातळीओरसॉ निंगालतॉ. त्यापायान पपाला बेताम दुख जाला. दादयला जिगाळा इ कळाला तिगाळा तिलापान वाटला, ‘नवसाऑ पूत, तॉंडात भूत.’

‘तर तुमाला ताहा वाटातॅ गा? ठीक हाय.’ आपला मनन्ना पपा ऑडॅ पटकान मानदॅ आहा महेशला सपनात पन वाटला नॉता. कतॅ एकदा जातॅ आन प्रियाला हांगातॅ आहा तॅला जालता. तरी पन एक महत्वाआ बॉलॅसा रॅलता.

‘पपा! आपल्यादरी दोन फ्लॅट आथ. तू रिटायर जालॉ तिगाळा हांगिलता, ‘तॅतसॉ एक माला आन एक रूनाताईला दॅनार मनून.’ महेशनॅ खडॉ टाकीलॉ. प्रियानॅ तॅला इ जक्ला पटवॉन ठविलता. आतॅआ काळात फ्लॅट घॅसॉ मिंजॅ कय खासा काम नॉता. फ्लॅटशॅ भाव कॉडॅ वाडलॅत. भगून वायलॉ फ्लॅट घॅनॅ शक्य नॉता. सादा भाड्यानॅ घर घॅसा ता पन परवाडला नसता.

‘मॅ तुमाला ता हांगीलता खरा पन तुमा भावंडांना तॅ फ्लॅट मिळदॅत तॅ, मॅ आन तुई ममी गेल्योर. मॅ मृत्युपत्रात ताहा लीऑन ठविले. ’ ‘तॅ फ्लॅट घॅताना मॅ माआ प्रोवीदंड फंडातशॅ पैशॅ काडलोतॅ. आन तूआ दादयनॅ तीअॅ डागिनॅ गान ठविलतॅ. इ तूआ बायकूला तू हांगीलता गा..? पपानॅ नजार रॉखॉन महेशवर बगीला. पपा बॉलना आयकॉन महेश का हुमजॅसा ता हुमजालॉ.

‘मंग आमी कडे जाशे..?’

“दॅट्स युवर प्रॉब्लेम, तुमी निरनय घॅटलॅ मिंजॅ तुमी कय ठरविलॅस हायदॅ. रॅशी सोय केलेस हायदॅ..’ पपासा इ रोकठोक उत्तर आयकॉन महेशला पुडॅ बॉल्तास आला नाय. आपु बॉलॉन फसल्याव, आतॅ इ आपलॅला जड जानार इ महेशला कळॉन सुकला.

‘पन पपा, तुमी ममी हरी एकदा बॉलॉन बगा ना..?’ महेशनॅ शेवट्शी गळ घायली.

‘तॅइ कय गरज नाय, तुमाला पायदॅ तॅ आपलॉ तॉ दुहरॉ फ्लॅट मॅ भाडॅन मिळदॅ. तॅये कागादपत्रे करॉन घॅआ लागॅदॅत.’

आपलॅ मनसूबॅ मातीत मिळालॅ, भगून प्रिया बेतान धुसफूसली. तीऑ बाप पन भॉळॉ नॉतॉ, तॅनॅ तॅ प्रियाला आदीस हांगॉन ठविलता, ‘माआ दरनॅ कय भगून मीळॅसा नाय.’ मंग तीनॅ महेशला दोशी ठरविला. तॅला तॅआ पपाला हारका पटविता आला नाय, अहॉ ठपकॉ ठवीलॉ. आतॅ तॅआ घर शांत शांत जालता. पपा ॲकटॉ ॲकटॉ तॅआ खोलीत जाऑन बॅहॅसॉ. दादय घराआ कामकाज बारझोड यात वखत घालवॅशी. महेशशा खोलीतनॅ लानॅआ रुबीऑ रडनॅव आवाज आलॉ गा, तॅआ दोगा डॉकरॅव जीव तलॅवलॅ हॉअॅसॉ. मंग पपानॅ वखत भरॅ करता नोकरी धरली. आपल्या अनुभवाव वापर पन हॉयदॅ आन आथा शार पैशॅ येदॅत, ऑहॉ तॅव विसार ऑथॉ. पन, घरसा वातावरण नाहालता.

कय दिहान खोलीत बॅहलॉ अहताना महेशनॅ तॅव मोबाईल घॅतलॉ आन एक मेसेज लिवीलॉ, “माय अपॉलॉजी पपा.”

“नक्षीआ काशीला तडॉ गॅलॉ गा, त्योर पडलेली शीर कायमशी नंदरॅ पडातॅस ना.! तू भितीओर खिळॉ ठोकीलॅ, तॉ आतॅ काडलॉ जरी, तरी तॅइ खून रॅतॅस ना.! महेशला उत्तर आला.

# नशा

\- सॅबी परेरा, भाटी

जॉन ऑफिससॉ घारा आलतॉ बास. आथपाय धवॉन गुरली घे ऑडॅत खिशात फोन वाजलॉ. फोनवर वॉल्टर. तॉ हान्गातॅ, जॉन जॉहॉ हायदा तॉहॉस ताबडतोब एमएम मीनॅ ये. लवकर ये.

बोळींज नाक्योरसा "एम एम बार अँड रेस्टॉरंट" मिनजॅ वॉल्टर, जॉन, विज्या आन पांड्या या चॉगाव नेहमींसॉ अड्डॉ. मयनॅला एकदा, जास्ती करॉन मयन्या दुहऱ्या हिनवारॅ, तॅ चोगी एमएम मिनॅ बॅहॅशॅ. दुहरॉ हिनवार ऑड्याबनी की तवपोत पगार झालॅलॉ आहातॅ आन हिनवार अहल्यामुळॅ दुहऱ्या दिहा हाकोटे उठयादो जुरुक उहूर जालॉ तरी सलातॅ.

वॉल्टर, जॉन, विज्या अन पांड्या याइ शाळेपासूनशी जोडी. सख्खॅ दोसत. शाळीत जादो यादो, दॅवळा जादो यादो, मिसा-सेवकशी पाळी करॅदो, परीक्षा दिहा भाटात शिशोर मासडा करॉन अभ्यास करॅदो, बॅटबॉल खॅळॅदो, पॉयादो, लॉकाय नाळ पाडयादो चोगी हस्साल शॅ हस्साल. आज चोगी पन्नाशी पोत पॉसलॅत. जॉ तॉ जॅआ तॅआ सवसारात आन कामाधंद्यात गुतलॅ. तरीपन या चॉगाइ मयन्याव दुहरॉ हिनवार ॲकमॅकांकरता राखॉन ठविलॅ. दोस्तीऑ वापॉ मयन्याला एकदा तरी हिपिलॉ पाय आहा त्या मनना!

ॲ शार मित्र मयन्याला एकदा बॅहॅशॅ मिनजॅ माज्यापोत प्याशॅ आहा नाय. लिग-लिगरी घ्याशे. सुख दुखायो वार्ता करॅशॅ. कुना कय खुटला-वाढला हांग्याशॅ, आयक्याशॅ. बायकू-पॉराइ खबारबात हॉयाशी. विज्या पोरीनॅ डेंटिस्ट हॉयॅ, पांड्या दोनू पॉराई कॅनडाला जाय, जॉनशा पॉरानॅ इंजिनियरिंग पुरा जाला गा अडॅस जॉब करॅ. इ जक्ला तॅआ ॲकमॅका गायी हाय. वॉल्टर लग्नाव रखडलॉतॉ भुगुन तॅय पोरे अजून शाळीत जाते हात. जकल्या लान्या पॉराघती ते पन आमी पायलट हॉयॅ आहा हांगात्यात. चोगी भेटले गा यॅ जकलॅ विषय निंगातॅत. ॲकमॅकांई चेष्टा-मस्करी हॉतॅ. मयनॉभर तुंबलॅलॉ काळजाव दांड मॉकळॉ हॉतॅ. आयुष्याव पानी निताळ-कास हॉवॉन वाया लागातॅ.

एमएमसॉ मॅनेजर संजू या चॉगाव एकदम जानीदोस्त! ॲ चोगी खाशॅ-प्याशॅ कमी. एमएम मिनॅ जमलॅ गा, शार-पास तास बॅहॅशॅ. पन संजूनॅ यांना कतॅ कय बोयला नाय. बारशा बार लॉकाई

वेटिंगशी लाईन लागलेली अहॅशी पन, बी कुनाला टेबल द्यादो या शार जनाई मैफिल उठव्यासा पाप संजूनॅ कत्यॅस कॅला नाय. तॉ हांग्यासॉ, पॉट भरॅदो आन एक दिहाशी नशा करॅदो अडॅ बेतान लोक येतॅत पन सुखदुख वाटॉन मन भरॅदो आन मयनॉभर पुरदॅ ऑड्या आनंदाइ नशा करॅदो ॲनारॅ तुमश्या हारकॅ खूप कमी हात.

या चॉगापैकी पैशान शेट अहॉ कुनूस नाय. चोगे खावॉन पॅवॉन सुखी या कॅटॅगरीशॅ. बिल आला गा, एकून रक्कम भागिले शार अहॉ बिलाव भागाकार हॉतॅ. जॉ तॉ आपापल्या वाट्याय पैशॅ देतॅ. जॉन दारूआ थेंबाला आथ, ओठ कयीस लावी नाय. पन आपल्या वाट्या बिल मात्री पुरा देतॅ. सुरवाती सुरवातीला वॉल्टर, विज्या, पांड्या जकलेस जॉनला दारू प्यादो बॅताम आग्रह कऱ्याशॅ. ओडिरी घेटली भुगुन कय हॉॲ नाय... कतॅतरी मयन्याला एकदा घ्यादो का हरकत हाय.... बियर तरी घॅ, बियर मिनजॅ कय दारू नाय ना... ब्रीझर घॅ! ब्रीझर मिनजॅ नुसतॉ सरबत.... गरॅ आमे पैशॅ भरत्याव तुयॅ.... आहा जक्ला कय हांगॉन जाला. पन जॉन मात्र बैला पाठीओरशा गोशींडीघती आपल्या तत्वाला चिकटॉन बॅहॅलतॉ. मित्राय तीन-शार पॅग हॉयात तवपोत जॉनसॉ एक ग्लास फ्रेश लाईम सोडा पुऱ्यासॉ. बरॅसदा पार्टी जाल्यॉर तॅआ तिघांना घारा हॉड्याशी जबाबदारी पन जॉनवरुस याशी. अन ती जबाबदारी तॉ आनंदानॅ निभाव्यासॉ.

जॉननॅ दारू कत्यॅस पिली नाय आहा नाय. तरुनपनी तॉ बऱ्यापैकी रेगुलर प्यासॉ. पन एकदा पॉरा फी करता ठविलेलॅ पैशॅ तॅनॅ पार्टी करता उडविलॅ. दुहऱ्या दिहा फी न भरल्याबनी तॅआ पॉराला मिनजॅ स्मिथला शाळीत बीआ पॉरा समोर बोल्ने खा लागले. स्मिथ रडात रडात घारा आलॉ. आन पॉरा डॉळयाशॅ आंहू बगॉन जॉन विताळलॉ. तॅनॅ कानाला खडॉ लाविलॉ की यापुडॅ दारूला आथ लाव्यासॉ नाय.

कडॅ लगीनकार्यात, हना-वाराला, नातॅ पार्टीला बॅहॅल्यॉर, मित्र प्यादो फोर्स करॅशे तिगाळा जॉन हांग्यासॉ "प्रश्न पैशाव नाय, तत्वाव हाय. आपुनूस आपल्या पॉराय रोलमॉडेल हाव. भुगुन मा पॉरा शिक्षान हॉवॉन तॉ मार्गी लागॅपोत मॅ दारूपासून लांब रॅसा ठरविलॅ. सद्या मॅ माव पैसॉ, माइ ताकत आन मा लक्ष इ जक्ला मा पॉरा शिक्षान आन तॅआ करियर यावर माला फोकस करॅसा हाय. आपले सपने पुरे करॅदो आपलॉ डॅडी कडॅ कमी पडलॉ आहा मा पॉराला वाटता कामा नये. आपल्या शिक्षनाला पैशॅ कमी पडात अहताना डॅडीइ प्रायोरिटी दारूला होती आहा बॉल्याशी संधी मॅ मा पॉराला दॅणार नाय. तुमे प्या, मा कय मनना नाय पन माला आग्रह करॉ नाका. पॉर नोकरी लागलॉ गा तुमाला मा तर्फे पार्टी देनॅ. अन त्या पार्टीला मॅ नक्की दारू पेनॅ. तवपोत माई थुई किंवा टाईमप्लीज का समजॅ ता समजा "

बाईक घेटली अन जॉन निंगालॉ. डॉख्यात विसार सुरु हॉतॅ. आज कादो बोलविलॅ हायदॅ. गॅल्यास आठोड्यात तॅ भेटलोते. ॲकास मयन्यात दोनदा पार्टीला बॅहॅलॅ आहा सहजा कतॅ हॉये नाय. तॅत आहा मिनशा दिहा तॅ कत्यॅस नाय. मंग कादो बोलविलॅ हायदॅ? विसार करता करता जॉन एमएम पोत पॉसलॉ. गाडी स्टँडला लाविली. बगीतॅ तॅ पांड्या, विज्या, वॉल्टर तिगी दरवाज्या बारूस उबॅ हात. ऑडा अर्जंट बोलविलॅ अन तिगी मित्र बार उबी हात इ बगॉन जॉनशा पॉटात फाळ पडलॉ.

वॉल्टरनॅ जॉनशा खांदयोर आथ ठविलॉ आन बोयलॉ, इ बघ, मॅ का हांगातॅ ता शांतपनॅ आइक. डॉख्यात राख घालॉन घॅव नाका. माला संजूऑ फोन आलतॉ. तॉ हांगातॅ "जॉनभाई का छोकरा आया है बार मे, अपने दोस्तो के साथ! जिस जॉनभाई को हम भगवान बोलते है, उसके छोकरे को बार मे देखके बुरा लगा. इसलिये आपको बताया" इ बघ जॉन, तू टेन्शन घॅवॉ नाका. आमे पन अडॅ आतॅ आल्याव बास. अजून मिनॅ जावॉन बगीला नाय. तू अडॅस थांब. आमी मिनॅ जात्याव आन पॉराला समजावॉन घॅवॉन येत्याव. वॉल्टर आन जॉन बार थांबले. पांड्या आन विज्या आतलॅंगा गेले.

जॉनशॅ डॉळॅ आहूंॲ भरल्यात. तॉ दाताय नाखे कुरतडतॅ. डॉखा विसार करॉन फुटॅदॅ आहा जालॅ.  आपुन इ ऑडा रगात आटविला ता कुनादो? का मिळाला आपल्याला? ओडे वहरे मॅ सॉताला दारूपासून लांब ठविला. मॅ लॉकांना हांगातोतॉ कि पॉर कमावतॉ जाल्याबिगर मॅ दारूआ थॅंबाला आथ लावणार नाय. अन ऑ अडॅ राजरोस मित्रा हरी प्यादो बॅहलॅ. मॅ लॉकांना सातीत आथ मारॉन हांगातॅ कि माव पॉर आहा कतॅ वाग्यासॉस नाय.... जॉनला आवट आलॉ. वॉल्टरनॅ तॅआ खांदयोर आथ ठविलॉ. ऑड्यात विज्या अन पांड्या हावात हावात आलॅ. बोयलॅ, "कय नाय! जरा मिसअंडरस्टँडिंग जालता. हांगातॅ सला.".

गाडयो निगाल्यॉ... नेहमीशा ठिकानी मिनजॅ मुनतळ्यॉर यॅवॉन थांबल्यॉ.... जॉन अजून सस्पेन्स मिनॅ...  तिगाई आळीपाळीन जॉनला मिठी मारली.... जॉन, हॉकऱ्या नशीबवान हा तू! तुला तॅ वाट्यास पाय, आमाला पन तुआ पॉराव अभिमान वाटातॅ. बायबल मीनॅ हांगिलॅ ताहा, तू पेरलॅला संस्कारा बियाना एकदम सुपीक जमिनीत पडलॅ. या बियानाला शंभर पट पीक येणार!

“अरे पन, जाला का ता तरी हांगेद्या गा नाय?” जॉन काकुळतिला यॅवॉन बोयलॉ

“आमी मीनॅ गेलॅ तडॅ तूओ पॉर; स्मिथ, त्या दोन मित्रा बरबर बॅहॅलॅ. क्यातरी सेलिब्रेशन सललॅ. तॅ दोगे खम्बॉ घॅवॉन बॅहॅलॅत आन खारसनीआ बैला हारकॅ पेत्यात. आपलॉ स्मिथ, तूआ

घतीस लिंबूपानी घॅऑन बॅहॅलॅ. आमाला बार मिनॅ बगॉन तॅनॅ स्माईल कॅला आन आमाला बोलविला.”

“अंकल लोग, का घॅनार बॉला”

“अरे स्मिथ, तू अडॅ कडॅ? आज का विशेष?”

“अंकल आज माला टीसीएसशी जॉब ऑफर मिळालॅ. मस्त पॅकेज हाय. मॅ जाम खुश हाय भगून या जिगरी दोस्तांबरबर सेलॅब्रेट करॅआ आलॅ.”

“अरे व्वा व्वा. काँग्रेच्युलेशन्स. अभिनंदन ! डॅडीला इ बातमी माईत हाय गा नाय?”

“नाय, तॅला अजून हांगीला नाय. तॅला सरप्राईझ दॅसा हाय.”

“स्मिथ, गरॅ सेलेब्रेट कऱ्या आल्या आन ग्लासात लिंबू सरबत घॅटलॅ तॉ?”

“अंकल मॅ ड्रिंक्स घॅ नाय. मा पप्पानॅ ठरविलता की पॉर कमवितॉ जाल्याबिगर मॅ पॅनार नाय. ताहास मॅ ठरविलॅ की माव पयलॉ पगार होयदॅ तिगाळा पप्पाला पार्टी दॅनार आन जर घ्या वाटली तर तिगाळास पप्पा बरबर पयलॉ पॅग घॅनॅ. आनी हा, तुमे पन नक्की यासा त्या पार्टीला. आतॅ तुमशा करता का मागवॉ बॉला?”

“स्मिथ, तुमसा सलू दे, आपुन नंतर भॅटॉ”

जॉनशॅ डॉळॅ आहूये भरलोतॅ. वॉल्टर, विज्या, पांड्या, जॉन चॉगाइ ॲकमॅकाला मिठी मारली.

मुनतळ्यॉर मस्त थंडा वारा हुटलोता. आबोर सावदस सॉ सांद उगवालतॉ. आख्ख्या वातावरणात एक बिन-दारूई नशा भरलोती. फ्रेंच वाईनशाघती ती बिन-दारूई नशा तॉंडात घोळवीत घोळवीत तॅ चोगी घारा जा निंगालॅ.

# खांबा खालसा भूत

- सिरील मिनेझीस, आगाशी (८२०८१०७२१३)

आलाराम वाजला तही  संजूला जाग आली. पक्की जाम थंडी पडलोती, तॅला पागुनातनँ बायार निंग्यादो जाम जिओर आलता. पन त्याला ऊठ्या लागला. तॅव मोंबयसाँ पास ऑथॉ. तॉ फुले घँऑन दादरला जासॉ. पयलाँ तॅव बाबा दादरला जासॉ पान तॅला वाताव फडकाँ भँहलँपासुन संजूनॅ पास काडलोताँ. घरसाँ हुक्काळीऑ माल आन दँरमँशाव माल आँहॉ तीन कंडँ  भरॉन त्यादरी माल अह्यासाँ. रातसाँ नव-साडे नवला तॉ एकेक कराँन तीन कंडँ नाक्योर खुरसा खाला नँऑन ठवँसाँ. पयल्या गाडीला तॉ दादर गाठ्यासॉ. मोंबय जा लागल्याला जेमतेम तॅला वहरीभर जालता बास. ऊनाळ्यात हौशिय तॉ ऊठॉन मोंबयला जासॉ पान पाहाळाँ आलॉ आन तॅला ऊठॉन पडत्या पान्यात जादो जाम जिवोर यासा. पान इलाज नाँताँ. तॅई बय तॅला ढॉसलाँन ऊठव्याशी. तीस गत थंडीत तॅई हॉयाशी.

आज तॉ आँहॉस तॅआ बयनँ  ऊठलाँ.. दात सोळलँ आन कपडे सडवॉन तॅनॅ सायकल काडली, आन ताँ नाक्योर पयली बस पकड्या निंगालाँ. वेहीतनँ ताँ बायार निंगालाँ आन मेन रोडवरनँ ताँ नाक्योर जादो निंगालाँ. वेहीतशा खाबोरसाँ बल बवतेक ऊडलाँताँ. आज तॉ पँटलाँस नॉतॉ. तॅआ नंतरशा दोन खांबाय बल पोरांनँ दगड मारॉन फोडलोतँ, तॅआ पायान तँ बल पँटँसाँ प्रश्नस नाँताँ. पान चवथ्या खांबोरसाँ बल पँटलँलॉ ऑथॉ, अमावशा हल्यापायान जकलाँ काळाँख ऑथॉ. पन बल पँटलेल्या खांबाखाला ऊजेड ऑथॉ. संजू सायकलवर भँहलॉ आन एक पायडर मारल्या खोटी त्यानँ बेरेक मारलाँ.

ऊजेडात संजूला एक पांड्या कपड्याशी आक्रुती  लांबनँस नदरँ पडतोती. तॉहाँ तॉ घाभरात नाँताँ पन का जालता,.. तॅआ बल पँटलॅल्या खांबाआ समोर एक भाडोत्री साळ ओथी. आन त्या साळीतशा ॲका टेलरशा बायकुनँ शारदी अगोदर फास घँटलाँताँ.  तॅआ पायान संजूआँ समज जालतॉ की इ पांड्या कपड्याशी आक्रुती मिंजॅ ती बाईस. तॅय आथपाय गळलँ. तॅनँ आपली सायकल जेमतेम मांगँ रिवर्स घेरमिनँ घेटली. आन ती आक्रुती तॅला दिख्याशी रेली. हिम्मत कराँन ताँ माकुन सायकलवर भँहलॉ आन दोन शार पायडल मारतँ गनाय तवं तॅनॅ माकुन ब्रेक माराँन सायकल होप केली. कारान ती आक्रुती माकुन तॅला दिख्या लागली. तॅनॅ सायकल माकुन वळवीली. आन ताँ डॉळँ फाडाँन बगीत रँलाँ. आक्रुती गायब जालती. आहा शार वॅळा जाला. सायकल विक्रमवाळाँ जाग्योर

सायकल फिरवितँ तही सायकल संजू फिरवितोताँ. घडख्यात ती पांड्या कपड्याशी आक्रुती दिख्याशी आन घडख्यात ती आक्रुती गुल होतोती. भर थंडीत संजू घामाय निथळ्या लागलाँ. पाय लटपट्या लागलँ. मांगे पुडँ कुन दिखात नॉता. दा मिनटे तॅआ जिवाई घालमेल जाली. आँड्यात मांगीरनँ इनुस येताना दिखलाँ. तॅला धिर आलाँ.

"काराँ संजू, आडँ थांबलँ तॉ. सल बस सुकँदँ."

इनुसनँ संजूला विसारला. वँळभर संजूला बोलूस फुटलाँ नाय. ताँ खुर्सा बुडोर भँलाँ. आन मंग त्यानँ जकली इस्टोरी इनुसशा कानोर घायली. इनुसनँ खांबाखाला बगीला पान तॅला कईस नाय दिखला.

"कईस दिखँ नाय माला. सल मँ हाय घाबराँ नाका."

इनुसनँ धिर दिल्योर संजू ऊठलाँ, पाववाला धरत्यात तही सायकल आथा धराँन ताँ इनुसशा मांगोमांग निगालाँ. दोगे खांबाखाला पोसले. घडखीभर तडँ उबँ रेले पान कईस त्यांना दिखला नाय. ते नाक्योर पोसले. बस आलती आन थांबलोती. दोगी बसमिनँ भेहले आन बस निंगाली. आहा लागोपाठ तिन दी जाला. संजु यासाँ, आक्रुती दिख्याशी, गायब हाँयशी मंग इनुस यासाँ त्याहरी संजू जासाँ. तडँ कईस नह्यासा. सवथ्या दिहा संजूला ताप भरलाँ. आन इ बातमी गावभर पसारली. संजूला रॉज भूत दिखातँ भगुन.

शिल्याआ कानोर इ बातमी गेली. शिल्या एक नाटक वँडाँ माहनु. त्यानँ चर्च मिनँ नाटक भँवँ घँटलाँताँ. रॉज रातसा साडे नव तँ रातशँ दिड-दोन पर्यन्त त्याई पराटीस(रिहसल्स) सलँशी. जकल्या दरी गाड्यो ओथ्यो, तॅ भरकान निंगाँन जाशँ पान शिल्यादरी सायकल ओथी ताँ सायकलीयोरनँ तॅआस रस्त्याय यासाँ. संजूई भूताई कानी तॅला कळाल्योर तॅआ जकला ध्यानात आला. संजू जाश्या दा पंदरा मिनटे अगोदर शिल्या तडनँ यासाँ. तॅनॅ पान इ भूत बगीलता ता पान दरनँ.....

त्या खांबा समोरशा साळीत जास्तीकराँन रेनाराँ भाडेकरु हॉनार कारागीर ऑथॅ. मुंबयवरनँ सराफ बजारातनँ तँ उहुरा घारा याशँ. त्यां मिनसाँ एक जिवान जाला गा शिगरेट फुकीत त्या खांबाखाला शतपावली क-यासाँ, इ शिल्या रॉज बगीताँतो. ताँ पांडी लुंगी आन फुल आथाआ गंजीफराक घाल्यासाँ. संजूला ताँ ऊजेडात आलाँगा दिख्यासाँ आन काळाँखात गेलाँगा दिख्यासाँ नाय. आन इनुस आलाँगा तॅई शिगरेट खप्याशी आन तॉ निज्यादो आपल्या खोलीत जासाँ.

इ जकला रहस्य शिल्यानँ संजूआ कानोर घायल्योर तॅव ताप ऊतारलाँ. दुह-या दिहा ताँ मोंबय जादो निंगालाँ. आक्रुती तॅला दिखली पान आज इनुसशी वाट न बगीता. ताँ सलात रँलॉ. आन तॅला ता, पाय ऊलटॅ नहलँला, लुंगी नेहलँला आन फुल गंजीफ्राँक घायलँला भूत दिखलाँता. ताँ गालाशा गालात आहालाँ. आँड्यात बस आली. आन तॅनॅ सायकल जोरात मारली.

# किश्शॉ फादर्स-सिस्टर्सशॉ

- फा. अंब्रोज फर्नांडीस, गोम्सआळी चर्च

आपलॉ एक भिगाव सॉ पॉर बारावीनंतर गोरेगाव सेमिनरीत फादर हॉयादो गॅलतॉ. पयल्या दिहा जकल्या कुटुंबाबरबर सेमिनरीत जॉइन जालॉ. आख्खी सेमिनरी बगिली. हानशापारा काळोख पडल्योर सेमिनरीशा टेरेसवर गेले, तडनॅ आख्खी मुंबय दिखातॉती. तॉ हायवे, त्या वरश्यो जकल्यो लाईटी, भोट्योभोट्यो बिल्डिंगी आन आकाशाशॅ तारॅ बगॉन त्याव बाबा बोयलॉ. "पॉरा, तू जत्तॉ सरगात आल्या. ई का बग्यासा, रानात भय साऱ्यात त्यापेक्षा प्रभूआ मळ्यात काम कर." एक निर्मळसॉ ब्रदर, जॉइन जाल्याला दोन वहरे जालते बास, बारा वहरे बाकी होते, त्या बाबाला पॉराऑ जाम अभिमान.. लोक विसऱ्यासा, "पॉर काते आलतॉ गा?". "हा, आलतॉ". "फादर हॉया कोडे वहरे रेले?" बाबाला कादो माईती. बारा बी हात ते.. तॉ बोयलॉ, " बो वहरे रेले नाय, लवकरूस ओडदी आली. आमशामिनॅ तॉ एक जोकुस जालतॉ, मग आमे त्या ब्रदरला शिडव्या लागले, "बो वहरे रेले नाय." मॅ दहावीनंतर रमेदी वियानी आश्रमला जॉइन जालतॉ. एक मयन्यान घरा विजिट आहातोती. मॅ विजीटला घरा आलॉ तॅ बापरे का आयक्यासा, जकल्याई एक साथ, "गुड मॉर्निंग, ब्रदर." मॅ हांगीला, "मयनॉ जालॅ बास, अजून १४ वहरे हात." बाबानॅबी कुर्तो हिविलतॉ.

जुन्या काळात साधारन ४० वहरा अगोदर नंदाखालसॉ एक ब्रदर फादर हॉया गॅलतॉ, गावकऱ्यांना कॉडॉ आनंद, त्याई बॅंड लाविलतॉ त्याला हॉड्यादो. पॉर बारकॉस हॉतॉ, सेमिनरीत गॅलॉ. दोन दी जालॅ गा आन बाबा-बयशी आन गावशी आठवन या लागली, रड्या लागलॉ. सिनियर ब्रदर हॉतॅ त्याई विसारला, "का जाले?" "मातॅ घारा परत जाय, माला घरशी आठवन येतॅ." त्याई हांगीला, "ऑडॉ बॅंड लाविलॉ, वाजातगाजात तुला धाडलॅ, रॅवाळा, लाडू, करज्यो आन हिंगोळ्यो खादो दिल्यात, पॉरा, यॉ मयनॉ तरी काड, गावशे लोक का बोलद्यात? आन बॅंडवालॅ गाळी नाय देद्यात आ?, त्यानॅ नंतर मयनॉस नाय काडलॉ तर आज ४० वहरे जाले फादर हाय.

सुळन्याशी एक सिस्टर कॉन्व्हेंटला होती. सुळनकरांना शिवने खाशी जाम हौस. कॉन्व्हेंटमिनॅ रजा मिळात नाय. तिनॅ भॉटया सिस्टरला हांगीला, "माला घारा जासा हाय." ती बोयली, "कुन शिकबिक हाय गा का?" "नाय.." मग कादो जासा हाय. तुला रजा मिल्याशी नाय." "माला एक महत्वाआ काम हाय." "का हाय?" "माला शिवने खादो जासा हाय". शिवन्याआ नाव काडला गा

तोँडाला पानी हुटातॅ, शिवने खा करता सिस्टर कॉन्व्हेंट हॉड्या तयार जालती. आज ती सिस्टर भॉट्या पदोर हाय.

गाहासॉ एक ब्रदर गोरेगावला होतॉ. पयले आपलॅ कुपारी बडेका खात नोते, आतॅ पाय दॅ तॅ मिळॅ नाय, त्या ब्रदरनॅ एक दिहा जाम बडेका खाला. याला झाडॅ उतऱ्या लागले, हाकोटे मिस्साला आलॉ नाय. रेक्टरनॅ बोलविला आन विसारला, मिस्सा क नाय आलॉ भगून.. ब्रदर बोयलो, "व्हॉट टू टेल यू, रेक्टर, ट्रीस, ट्रीस, ट्रीस."रेक्टर घाबारलॉ, यॉ कुहनॉ रोग जालॅ हायदॅ. त्यानॅ बी एक वसयश्या ब्रदरला बोलविला. त्याला हांगीला, याला ॲडमिट कऱ्या लागॅदॅ गा का?, तॉ ब्रदर 'ट्रीस' आयकॉन हाव्या लागलॉ आन बोयलॉ, "रेक्टर, टेंशन घेव नाका, आमा कुपाऱ्यांना बडेका खाशी हवय नाय, यानॅ राती बऱ्यापैकी रगडलोता, त्याला झाडॅ उतारले. आमशा भाशॅत लुज मोशनला झाडॅ बोलात्यात, याला इंग्लिश ऑडा ये नाय, त्यामुळॅ त्यानॅ 'ट्रीस' बोयला.

गोरेगाव सेमिनरीतनॅ ब्रदर हिनवार-आयतवार वॅगवॅगया देवळा मदत कऱ्या याशे. पाली देवळात एक अंगाला बारीक अहलेल्या ब्रदरशी नेमणूक जालती. हीनवारॅ या ब्रदरशी फादरनॅ ओळख करॉन दिली. पन त्या दिहा सिस्टर, जी साक्रेस्तिनसा काम करतोती, ती नोती. तिला कादो माईती हाय नवीन यॉ ब्रदर आलॅ तॉ. दुहऱ्या दिहा हाकोटश्या पयल्यामिस्सोर यॉ ब्रदर कोमिनॉ द्यादो आलॉ. यानॅ फादरसॉ लोब घायलोतॉ. सिस्टरनॅ बगताखोटी ती शिडली, "तू ऑल्टरबॉय फादरशे कपडे कादो घायल्यात." ब्रदर हांगातॅ, "मॅ ऑल्टरबॉय नाय, ब्रदर हाय". पन सिस्टर आयकॅस नाय, नंतर मिस्सा खपल्योर फादरनॅ जिगाळा ओळख करॉन दिली, तिगाळा सिस्टरनॅ ब्रदरशी माफी मांगिली.

नंदाखालसॉ एक फादर लानॉ असताना नानभाटला मामारा जासॉ. तिगाळा नानभाटशे पोरे याला माऱ्याशे. तॉ घरा यॅवॉन जाम रड्यासॉ, ऑडॉ रड्यासॉ की बय कंटाळ्याशी, ती हांगातॅ, कादो रडाता, बॉल गनी.. तॉ हांगाते, "आतॅ करता नाय ना रडॅ, उद्या करता... त्यायी हांगॉन ठविलॅ, उद्या मामारा ये बास, तुला परत ठोकीत्याव" माव एक पॅरिश प्रिस्ट होतॉ, तॉ जाम भायासॉ, एकदा त्याला गावात बेजीमात कऱ्या जासा हॉता. स्कूटरला किक मारतॅ पण सालू कय होय नाय. मॅ ट्राय केली, ब्रदरनॅ ट्राय केली, शेवटी गॅरेजसॉ माहनू बोलविलॉ, तॉ चेक करीत असताना लक्षात आला की 'सावी' लाविलीस नोती. सावी रूममीनॅ होती.

आपलो एक जुनॉ फादर. त्याला डॉक्टरेट मिळालती, त्याई देवळात ओळख केली, आपलॉ फादर खुब अभ्यास करॉन, मेहनत करॉन डॉक्टर जालॅ. दोन दिहानॅ एक डोकरी तापाई आली. फादरला हांगातॅ, "फादर, खुब डॉक्टरसा ऑखांद कॅला पन ताप उतरॅस नाय, तुमॅ आतॅ नवीन डॉक्टर जाल्या, तर माला तपासा गा आन चांगला ऑखांद द्या. फादर खोखाटॅ हाव्या लागलॉ आन बोयलॉ, "मॅ तॉ डॉक्टर नाय न धोतनीऑ डॉक्टर जाले.' तीला समजाला ताहा ती पन हावात निंगाली आन जाता जाता तिऑ ताप उतारलॉ.

# नक्की कून रॅ तू ?

- ब्रिनल कुडेल, गास

हाडाआ माहासॉ तू
उन्या रक्ताऑ तू

मॉडलॉ पन उबी तू
कायम खमकॉ तू

आज अहॉ क वागाता तू ?
नात्याव बाजार को मांडिलॅ तू ?

मुखवटॅ घालॉन बदललॉ तू ?
तॉंड निकविदा कडे तू ?

माणुसकी शब्दातूस ठविली तू ..
नांदवीला नाय तिला तू ..

भरॉसॉ खपलॉ, माहनू  नाय रॅलॉ तू ?
नात्या घर बांध्यासा कहा तू ?

आतॅ तरी लॉबानॅ जागॉ हॉयदा गा तू ?
रॅदॅ गा ध्यानात मातीस तू ....

# योग्यता

– पॅट्रिक कोरिया, फ्लॉरिडा, अमेरिका

सादारन १९८२ शी गोश्ट हायदॅ. मॅ नाशिकनॅ मुंबय या निंगालतॉ . नाशिक तॅ बॉम्बेसेंटर अही बस ओथी.  मुंबय शा बार बस शी सोय तोडी कय बरी नोती. नहॅशिस. “बहुजन हिताय बहुजन सुखाय” ई आहा यशटीत लिवीलॅला आपल्या नंदऱ्या पडातॅ. पन बस डायवर आन कंडाक्टरसा वागना ई “बहुजन हटाय बहुजन सताय” अहया परकारसास अहेसा. मॅ नाक्योर बस पकड्यादो गॅलॉ पन बससॉ कय ठावठिकानॉस नाय.  कुन हांगातॅ या दिहा बस जाय नाय, तॅ कुन बॉलातॅ बस हाकोटशीस गेले. नाक्योर अहलॅल्या पानवाळॅनॅ आहा सुसविला गा चोगी तयार हॉतॅत हायदॅत तॅ टॅक्शीनॅ जाता येदे. भाडा पन चॉगात वाटला जायदॅ तॅ भाडा घना पन वाटॅसा नाय. पानवाळयाव ऑ विसार माला एकदम पटलॉ.

मंग मॅ बीआ तीगांना शॉद्या लागलॉ पन कुन बरॉ माहनू दिखात नॉतॉ. एक सादारन मुसलमानी कपडे कॅलॅलॉ,  आपल्याअडे पयलॅन श्टो नीट कऱ्या याशे तहयातसॉ ऑ माहनु, गेले दा-पंदरा मिनिटे ॲंगातॅंगा करताना माला दिखलॉ. होळी नंतर बिहार, यूपीला गॅलॅलॅ भैयॅ परत येतॅत तिगाळा त्यांशे जहे कपडे अहत्यात तहास पन जुरूकसॉ रंगबिरंगी धुयलॅलॉ पॉशाक तॅनॅ कॅलतॉ. पान खात तॉ मा मॅरॅ आलॉ आन माला बोयलॉ, “आज बम्बई जानेवाला कोई मिलनेवाला नही”.  मॅ त्योर लक्ष दिला नाय. घटका भरान माकून पुना आदीसास बॉलॉन, “अगर चाहते हो तो हम दोनो साथमें जा सकते है”आहा कयतरी बोयलॉ. शार जनापैकी दोगीस गेले तॅ भाड्याव पाव ऐवजी अर्दो भार मा आंगोर येदे ऑ विसार मा डॉखॅत घॉळातोतॉ. तही माला पैशाइ कय अडसन नोती पन तॅआ माहना बरबर परवास करॅसॉ इ माला पटात नॉता. पन तॅला बिओ ईलाज नॉतॉ तॅतॅन मॅ राजी जालॉ.  थॉड्यास वॅळान एक बॅग घॅऑन तॉ आलॉ  आन आमी दोगाई एक टॅक्शी केली आन परवासाला सुरवात जाली.

बॅहल्या बॅहल्या तॅनॅ  पुचुक्कन (पचकन) पिसकारी मारॉन  घसॉ आन तॉंड खाली कॅला आन “मेरा नाम मुसीबत खॉं है, भंगार का धंदा करता हूँ” आहा मॅ न विसारतास तॅनॅ जाइर कॅला. “आयला! नसती मुसीबत आली आ! माला तॅआ बद्दल जा वाटातोता नॅमका तास जाला. तॉ निंगालॉ सादॉ भंगारवाळॉ. ए अहे चिल्लर लोक  माआस नशीबात क येत्यात  देव जानो! आदीस

हांग्या या का जातोता..?” मॅ मा हरीस बोयलॉ. तॅआ नाव आय्कॉनुस मॅ अजून खिडकी मॅरॅ सरकालॉ.  मॅ तॅला मा नाव शिक्षान नोकरी सब्बान आहा हांगीला गा “मॅ कय अहॉ तहॉ माहनू नाय. मॅ तुआ डॉखॅत पन जासा नाय ऑडा शिक्षान कॅलॅ. मॅ बेतान पॉसलॅलो माहनू हाय.” तॅला इ हुमजावा.  मॅ कय डायरेक्ट बोयलॉ नाय पन तॅआ ध्यानात हाडला. मिंजॅ तॅनॅ ॲखाद्या “सायबा” हरी जाहा बॉल्या वाग्या पाय ताहास मा हरी वागावा इ तॅला मॅ दावडॉन दिला.  मा बॉलना  जाल्योर ५ मिनटे आमा दॉगा पैकी कुन कइस बोयला नाय. तॅतॅन माला जरा बरा वाटला.

मंग “मै जरा हिसाब किताब करू तोआप को कई तकलीफ नही होंगी?” आहा माला वीसरॉन तॉ कामाला लागलॉ. आपलॉ कय सबंद येनार नाय आहा वाटॉन मॅ खूश जालॉ. तास दिड तास तॉ बॅगेतशा वायल्या वायल्या  कप्प्यातनॅ  पैशॅ काडॉन मॉजॉन  एकत्र करतोतॉ. आहा दोनदा जाला आन मंग तॅआ तॉंड उतारल्यागत  वाटला. तिगाळा तॅला का जाला भगून विसारला पाय आहा मनांत आला पन मॅ गरज नसताना ‘हुई लावॅान पारय खा गॅलॅा’ आहा हॉयदॅ भगून मन पुडॅमांगॅ हॉतॉता. शेवटी मॅस “क्या हुआ” आहा वीसरॉन त्योर डोकाईत रॅलॉ. तॅआ हिशोबात १०० रुपय कमी आल्यात आहा तॅनॅ हांगीला. “या तो मै गिनती गलत कर रहा हूॅ या १०० रूपये मुझे कम मिले होंगे” आहा कयतरी बोयलॉ.

आतॅ मॅ जरा मॉकळॉ  हॉऑन तॅआहरी बॉल्या लागलॉ आन मंग शेवटाला आमी दॉगाइ माकून एकदा पैशॅ मोजीलॅ तिगाळा तॅ बरबर निगालॅ. तॅआ बॉलनॅतनॅ माला ऑडा हुमजाला गा तॉ ७ लाख रूपय मोजीतॉतॉ. तॅतशॅ २ लाख तॅइ कमाई आन ५लाख खर्स जाल्तॉ.  तॅ ५ लाख तॉ मुंबयशा जॅआ दरनॅ खपलोतॅ तॅला तॉ द्या निंगालतॉ. (मॅ आकडॅ अंदाजपंचे दिल्यात). मॅ विसार कॅलॉ गा माव जॉ तिगाळा पगार ऑथॉ (१९८२) जरी तॅतनॅ कय कापीला नाय तरी २ लाख कमाव्या माला बरेस वहरे लागलोशे आन या माहनाला तॅआ ॲका सौदयात ऑडॉ फायदॉ..?  या विसारानॅ माला तॅआ पुडॅ  आपुन ‘किस झाड की पत्ती’ हाव इ कळॅ वखत नाय लागलॉ. माला माआ वागन्याई लाज वाट्या लागली.

मनात आला गा माआ शिक्षान आन माई नोकरी इ तॅआ कमाई बरबर येऊ शकॅ नाय. मॅ जाम वैतागलॉ. पन ता तोडयोर कय भागला नाय.  टॅक्शी बॉम्बेसेंटरला  याशा  आदीस मुसीबत खानला उतरॅशी घाई जाली. मुसीबत खान आन टॅक्शीवालॉ बार उतारलॅ आन त्या दोगांत कय बोलना जाला.  मा डॉखॅत विसार घॉळॅआ लागलॉ गा ‘ऑ खान आदीस उतारल्यानॅ बॉम्बेसेंटरपोत जाशॅ पैशॅ तॉ दॅनार नाय आन टॅक्शीवाळॉ तॅ पैशॅ मा दरनॅ घॅनार’.

इ विसाराआ घॉळाना सुरू हाय आन त्योर मॅ कय बॉलॅ ऑडॅत मुसीबत खान मालास बोयलॉ,’बहुत शुक्रीया भाईसाहब! टॅक्सीवालेका हिसाब सब हुआ है. उसे हम दोनोका सब पैसा मिल गया है. आप गल्तीसे पैसा दुबारा नही देना. बराबर है ना टॅक्सीवाले भायी?” टॅक्शीवाळॅनॅ मुंडी हालवॉन  हा हांगीला. मॅ आपलॉ बॉल्यासा भगून नुसतास ‘नही-नही, मत लो – मत लो’ आहा बोयलॉ.  माला तॅ काहातरीस वाटातोता. पन मॅ तोंडोरनॅ दावड्ला नाय. ऑडॅ पैशॅ ॲकलॅनॅ नाशिकनॅ मुंबय हाड्याशॅ मिंजॅ कुनतरी जोडीला पाय आन मुसीबत खानला मॅ भॅटलॉ इ जक्ला माआ ध्यानात आला.  नुसत्या कपड्योरनॅ मुसीबत खान बद्दल    मॅ जॉ विसार कॅलॉ तॉ कॉडॉ सुकीऑ ऑथॉ इ माला कळॉन सुकला. मुसीबत खान पेक्षा  माआ शिक्षना घर कॉडा रिकामा हाय आन माआ नोकरीॲ वाहँ कॉडॅ पोकळ आथ ता पन माला दिखॉन आला.

तॅआ दिहा नियतीनॅ माला बरबर धडॉ हिकवीलॉ. बॉम्बेसेंटरला  टॅक्शीतनॅ बार उतारलॉ आन टेशनला जा करता सल्या लागलॉ तव आंगोर कयतरी पडला आन  खांदॉ ऑलॉ लागॅ लागलॉ. लक्षात आला गा वरनॅ जाणाऱ्या  कागूळ्यानॅ नातॅ बगळ्यानॅ त्याव दोन तीन दिहाव जक्लो भार माला अहेर भगून माआ आंगोर टाकीलॉ.  लगेस टॅक्शी करॉन मॅ चर्चीगेटला गॅलॉ. टॉयलेटमीनॅ सदरा साप कॅला. मंग टेशनोर पंख्याखाला सदरा थॉडा हुक्ल्योर मॅ ट्रेन पकडॉन घारा आलॉ. मुसीबत खान लाखाव माहानु जॅला मॅ कमी लेखीतोतॅा, आन मॅ हजाराव पन नॉतॅा पन तॉ माला मान देतॉतॅा.

त्या परसंगानॅ – माहनाइ किंमत, पात्रता वा योग्यता तॅआ कपड्योरनॅ, दिखनॅनॅ, शिक्षनानॅ, डिग्रीनॅ  नातॅ नोकरीनॅ ठरॅ नाय – ऑ धडॉ मॅ हिकलॉ आन तॉ माला आख्खॉ जनमभर उपयोगी पडलॉ.

# बय पान

- रॉबर्ट फर्नांडिस, फर्नात आळी

ती धावली, ती पळाली, जिवाशा एकांतानॅ आन ती जिकली

आताशा काळाशो ऑ वारू एक-दोन अवलाद जाली गा तॅना थकल्या घतीन ऑथॅ आन तॅत मग शाळीशी गाठीला गा हळूहळू एक-एक आजाराला त्यांना तॉंड द्या लागातॅ. तॅला तहे भरपूर कारने आथ, तॅत मुळ मिंजॅ ई धग-धगीआ जीवन आन सवसाराई शिंता. मंग कंबार दुखी, हात-पाय दुखी आन बऱ्यास आजाराला बॉलावना..... पयल्याशा बायकाई का ती कमाल तीस कळॅ नाय ? तॅना आठ-दहा पोरे जाले, ऑडॉ सवसार हांबाळलॉ, भोटा कुटुंम.. तरी पन ते आतॅ मातारे जाले आहॉनसुदा कडाक अन निरोगी कहे यॉ प्रश्न पडातॅ..

अहिस एक बय, तांबड्या लुगड्यावाली- जा लुगडा आपल्या कुपाऱ्याई शान, जी बाई वयानॅ ८० वहरे पूर्ण केलेली, तॅत विधवा, आयुष्यात तिनॅ बॅताम अडसणीला तॉंड दॅऑन सुद्धा मनानॅ खंबीर रेली. ऑडया पॉराव योग्य हांबाळ करॉन त्यांना योग्य मारगोर लावणारी. ती सुद्धा नवऱ्याई योग्य साथ मिळाली नसताना, आयुष्यात तिनॅ ओबड्या दुःखाला सामोरे जाऑन.. मिंजॅस तारुण्यात एकट्या पॉराला गमवॉन ती रॅलॅल्या- बाकीशाव आधार बनॉन जीवन जगती हाय.

जिगाळा गास मॅरेथॉनमिनॅ भाग घॅताना एकूस तिनॅ विसार कॅलॉ गा माहनु वयानॅ जरी मातारॉ जालॉ तरी मनानॅ जवान पाय... जीवनात संकटे अन अडसनी येनार-जानार भगून कय रडात बॅहनार? ई गासकर बय, तीनॅ विसार कॅलॉ गा मॅरोथॉन मिनॅ भाग घॅऑन जिक्यासा. आन तिया हारके जीवनात निराश जाल्यात त्यांना पुनः जीवन जाग्यादो उबारी येदॅ. ती जिगाळा भाग घॅऑन पळ्या लागली तिगाळा खूबशा लोकांई, टिगल करॉन मजाक उडविलॉ पन डोकारी मनान खंबीर... ती जही सुसाट्यानॅ पळाली ती जिकल्योरुस थांबली. मग तीआ जमलॅल्या सब्बान लॉकाई पापोळ्यो वाजवॉन अबीनंदन कॅला. अही ई आपली बय नाताल फरगोज इने आपल्या आन इतर तिये जोडीदार पुडे एक आदर्श, एक हुरहूरी ठोविलो की ... जीवनात हार नाय मान्याशी.

# सामवेदी खाद्ययात्रा

- केतकी अभिजीत वझे,
मर्देस(नामआळी)

काल हांशी जाम भूक लागलोती, पॉटात नुसतॅ कागुळे आड्डात ऑथॅ... कईतरी आहा मस्त खा वाटातॉता पन नक्की का खासा याव अंदाज कई लागात नॉतॉ. पन रॉजसॉ तॉ वडापाव आन समोशी खाऑन पन माहनू जाहा कंटाळलॉता.. मंग कय गराम गराम खासा बोईला तॅ माई बय पन घारा नोती.. मंग का..?... का खाव ऑ

विसार करीतूस सुलीपुडॅ घुसली.. आन मंग सध्याआ पूर्णान्न भगून समजला जानारा आपल्या हवईसा "इन्स्टंट नूडल्स" सा पाकीट काड्ला आन मंग का दोन मिनटात तयार... घाईतूस ताटली भरली आन हळूहळू गिळ्या सुरुवात केली.., पॉट ताहा भरात हॉता पन मन कई तृप्त वाटात नॉता ऑड्यात आमशी दादी मॅरॅ ॲवॉन बेहली आन मंग आमश्यो वार्ता रंगल्यो आन मंग "तुमा आजकालश्या पॉरांना बारश्या विक्त्या खान्याबिगर बी कई सवूस माईती नात, बॉलता बॉलता ती तीआ लानपनायो आठोनीॲ जहॅ दॉरॅ उगडॅ लागली...

पो, शिरॉ, उपमा आन त्याहरी कनेरीऑ तांब्यो मिंजे आमश्या रॉजश्या सामवेदी हाकोटशी सुरुवात. मंग कतॅतरी जिबीला सव बदल भगून हुतॅळॅ, दुधलाडू, भेंडीआ पानाशो पानमोडयो, पिठाॲ कुडकॅ, गवा पिठाआ सत् ,दॉदाल बनव्याशे.. मला आठवातॅत तॅ सवदार अहॅ उकडीॲ लाडू... तॅ मिंजे आपला सामवेदी पक्वान्नुस.., जकल्यांस आवडीए.. लाडू करॅशॅ बोइला गा बायको घरशे साउळ-वाटुळ्यो जात्योर दळॉन घ्याशो.. आन मंग रीतीपरमाने पैलॅ गॉडाॲ आन मंग उळडा दाळीॲ.. वालायो हिंगो अहल्यो तॅ मंग गॉळ्यांए.. मंग जिवना मॅरॅ जातॅ कुन.? गा मंग जिवनाई हुट्टी.. जकले मन पॉट भरॉन आवडिनॅ लाडू खाशे..

वाला हिंगाई सुरुवात मिंजे आपल्या बामणा करता उत्सवुस.. तहॉ आज पन हायूस.. आन मंग सुरुवात हॉयाशी पक्वान्ने बनवॅशी.. जिवनात वांगे, गॉळा बटाट याई सुलीवरशी भाजी मिंजॅ बास.!!! आनंदी आनंद...

रॉज जरी जिवनात अहली तरी वीट नायूस आन तॅआ जोडीला जॅ शेंगदानॅ आमटीई जोड़ मिळाली तॅ ताटोर ब्याहॉन ताव मारॅसॉ.. मंग एखाद दी कतॅ बटाट भरलॅला आन गराम मसुळ अहला गा मंग जिताना दोन आथ.. कतॅतरी हना दिहा डाळ, भात, वांग्याई भाजी, शेंगदानॅई आमटी, कोशिम्बिर, वड्यो, खीर-पूरी, आळुवडी, घरसॉ पापड अही बामणी थाळी अहली मंग तॅ सॉरगासुखुस..!! पन जक्लॉ सैपाक गॉड टाकॉन कॅलॅलॉ हा..

कतेतरी उपासा दिहा कॅळ्याई मुग नातॅ गॉळॅ घालॉन भाजी अहली तॅ मंग उपास नहलॉ तरी त्योर ताव.. हानश्यापरा शा बरबर खादों भगून मुठॅ नातॅ बोंडाई रोटी.. मंग शा प्यादो पन मजा.. कतॅ गॉड खा वाटला तॅ रॅवाळा आन जकला कुटुंम घरा अहला गा तळनायो  रोट्यो आन हॅवॅशी खीर..

घरांत कुन शीक नातॅ बाळंत अहली गा तीआ करता  गवा रव्याशी खॉल्या शिरिशी पांगी आन ती खादों जोड़ भगून तांबोटॅऑ रस बनव्याशे आन मंग तॉ वास आख्या घरांत घुम्यासॉ.... शाळीला हुट्ट्यो पडल्यो गा आमाला वेध लाग्याशे ते मामारा जाशे आन बयो सुसाव्याशो त्यो आख्या वहराऑ संसार भरॅदो.. मंग तॅआ मिंनॅ पापड़, कोळ्याए वड़े, मशाले, मुरांबे, राय-मेथ्याई सटणी.. ई जकला मुजिंमिनॅ नातॅ काशीआ बरणीत भरॉन ठोयाशे.. ई जकला कदो तॅ घरांत संसार भरलॅलॉ पाय आन वहरीभर धास्ती नका भगून..

कई पन हांगा पन तिगाळश्या खान्याला कई वेगळीस सव आन मजा होती जी आतॅ रेली नाय, आन तुमश्या आतॅआ पॉरांना ती कळ्याशी पन नाय.. मॅ पन तिआ बॉलना कान दॅऑन आयकात ओथी... तिआ त्या बॉलनॅतनॅ माला आपल्या "सामवेदी बामणी"  खान्याविषय बॅतान माइती तॅ मिळाली.. मनातनॅ वाटला डोकरीनॅ जरा बड़बाड केली पन त्या बॉलनॅतनॅ तिनॅ माला आपल्या सामवेदी बामणी खाद्य संस्कृतिऑ एक  "सामवेदी खाद्यप्रवास" घडवॉन हाडलॉ..

# बॉड्डाइ बाव - सायमन मार्टिन, भुईगाव

आमशा घरापासॉन लाम ओथी
बॉड्डाइ बाव

बॉड्डाइ बाव
एकूस बाव ओथी
अरदॉ गाव बाइयोर पानी भरॅदो जासॉ
पॅसॉ पानी आमी बॉड्डाआ बाइयोरनॅ आढॅश्ये
हॉळॅआ टाकॅदो दापूडॅ बी बाव ओथी

दादी रानाभाटात जाशी
बाय माई बॉड्डाआ बाईसॉ पानी भरॅशी

बाय पाचवीला हायदॅ
ती डोख्योरनॅ पानॅव हांडॉ घॅऑन याशी
हांडॉ ऑथॉ खूपूस बॉठॉ बायशी मान मॉडयाशी
ती पान्याय निथळॅशी...
रॉज दोनशार हांडॅ हाडॉन ती शाळीत जाशी
शाळीतनॅ आल्योर रानभाटात जाशी

बाय अरदॅ वाटयोरनॅ निगॉन गेली
सुली पुडशी पानेरी
सात भांडे रॅशे ती तर कतॅस गेली
घरा मिंगारा बाव आली नळ आलॅ
मॅ हांडॉ अजून तहॉस ठविलॅ

बाय मिंजॅ सॉतास एक बाव ओथी
नितॅस ठविलॅ हांडॉ भरॉन माआ डॉळॅत
तॉ कत्तॅस आटल्यो नाय
बाय माञ न हांगता
माय डॉळॅ पान्याय भरॉन गेली.

# **दॅवा माला तुला कय हांग्यासा हाय** - मॅक्लीना रिबेलो, चौकाळा

दॅवा माला तुला कय हांग्यासा हाय
आतॅ माला शाळीमिनॅ जाव्यासा नाय
हाकोटे लवकर उठव्यासा नाय
दप्तरा वजान आतॅ पॅलव्यासा नाय

आठ वाजता मा डॉळॅ पडात्यात
नऊ वाजता पॉटात कावळॅ कॉकात्यात
सायकल वर तंगडा आतॅ मारव्यासा नाय
ग्राउंड वर मा बळॅ पळव्यासा नाय
दॅवा माला तुला कय हांग्यासा हाय
आतॅ माला  शाळीमिनॅ जाव्यासा नाय

मोबाईल शिवाय  मा भाग्यासा नाय
टीव्ही शिवाय माला रॅव्यासा नाय
शाळीसॉ रस्तॉ माला आठव्यासॉ नाय
मास्तर सॉ मार माला खाव्यासॉ नाय
दॅवा माला तुला कय हांग्यासा हाय
आतॅ माला  शाळीमिनॅ जाव्यासा नाय

घरश्या घारा मॅ मॅंडॉ जालॅ
अभ्यासावर मा पॅंडॉ पडलॅ
कुनाला कईस पडला नाय
मा शिवाय कुना कई अडला नाय
दॅवा माला तुला कय हांग्यासा हाय
आतॅ माला  शाळीमिनॅ जाव्यासा नाय

दॅवा ई सल्ले ता बरा सल्ले
खावॉन  पॅऑन मा पॉट वाढलॅ
दॅवा मा सुखा दी घॅऑ नाका
आतॅ माला शाळीमिनॅ माकून धाडॉ नाका
दॅवा माला तुला कय हांग्यासा हाय
आतॅ माला  शाळीमिनॅ जाव्यासा नाय

# **वाटणी** - श्रीमती शकुंतला नारायण पाटील, नवाळे

ए पप्पा, बय अडेस रेओंदे
वाटनी नाका, तिला तिआ घरास् जिओंदे
डोकारपनी तॅना तॉडॉ नाका
बाबाआ आतॅ जालॅ खॉका !!

बय माला जिगाळा, वॅगॅत घॅतॅ
मावलीऑ भास, माला तिगाळा हॉतॅ
तुआ करता ती खप खप खपातॅ
जिवापाड ती तुला जपीतॅ !!

तुला हिकव्यादो, विकिली वाळी
बाबानॅ तिगळा, तीला मारल्यो गाळी
नाका फिरवॉ आतॅ, तॅई थाळी
बय आपली बिशारी, हाय भोळी !!

हॅताभाटात खुप खपली
मम्मीआ सुखादो ती टपली
तीआ बळॅस जमिन टिकली
लोकाई बग जक्लि विकली !!

तिआ लुगड्यॅओ जुनॉ वास
माला ऑथॅ वायलॉस भास
तिनॅ काडलॅ बॅताम तरास
माला पाय तिऑ सहवास !!

मम्मीला हांग मायेनॅ बॉल
मामारा नाका गाओ तिआ गराना
कॉडा रॅलॅ तिआ अजून जगना
ममीआ पटॅ नाय इ वागना!!

आतॅ तिला सुखात ठॉऑ

खा,प्यॅदो बरा दॅऑ
मेल्योर दि वार कमी घालॉ
मन पॉट भरॉन ऑबडा आतॅ बॉलॉ!

तुमसा डॉकारपनी मॅ करनॅ
तळ हाता फॉडा हारका धरनॅ
बॅस माला मिळदॅ वरनॅ
बय करता माऑ जिव मारनॅ!!

पेरदे ताहा उगवातॅ आहा हांगात्यात
दॅवा करता नुसते टांगात्यात
बय, बाबाला वॅगळा रॅआ हांगात्यात
समाजकार्य बळॅस मांगात्यात!!

---

## **सारोळ्यो** – ख्रिस्तोफर रिबेलो

१) कुडाआ फटीत, पॅंड्याआ राहीत
"कुकाबाय"सॉ खेळ आते खॅळ्यासॉ हॉतॉ
जुन्या घरा बोठ्या लांब्या ओट्योर
चन्यो-गोटॅ, भोवरॅ खॅळ्या जोडीदार पावतॉ

२) जडॅ पायी जीनॅ सड्याशॅ तडॅ लिफ्टनॅ जाना
या मिनसा अंतर जिगाळा कळदॅ
तिगाळा कुनाला कॉडा जवळ घ्यासा
आन कुनाला कॉडा लांब ठव्यासा यी कळदॅ




Head Office : Catholic Bank Building, Papdy Naka, Papdy, Vasai West, Dist. Palghar - 401 207, Maharashtra

Board Lines : 9527441600 / 9527451600 / 9527461600 / Toll Free : 1800-266-2407 | www.bccb.co.in